# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ / आषाढ २०, १९४७ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**<br>**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(७) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री**<br>**(८) वस्त्रोद्योग मंत्री**<br>**(९) सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

### विदर्भातील सिंचन प्रकल्प अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(१) * २६१९ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात शेती उत्पन्न आणि व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या १२७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून, यापैकी ४६ सिंचन प्रकल्प पूर्ण झाले आहेत व ५५ सिंचन प्रकल्प प्रगतीपथावर आहेत, तथापि, विदर्भातील १११ लहान-मोठे सिंचनाचे प्रकल्प अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ३०-४० वर्षांपासून विदर्भातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी अनेक वेळा सुधारित प्रशासकीय मान्यता देऊनही, निधीअभावी अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत, ज्यामुळे या भागातील केवळ ४०% जमीन सिंचनाखाली येत आहे, तसेच १७ सिंचन प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत व ९ प्रकल्प अदयापही सुरु झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सिंचन प्रकल्पांवर हजारो कोटी रुपये खर्च करूनही शेतकऱ्यांना पाणी मिळाले नसल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, विदर्भातील ९५० हून अधिक मोठे, मध्यम आणि लघु सिंचन प्रकल्पांवर खर्च करण्यात आलेला एकूण निधी, त्यासाठी लागलेला कालावधी आणि त्यामुळे वाढणारी सिंचन क्षमता याची श्वेतपत्रिका (White Paper) निर्गमित करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, रद्द झालेले सिंचन प्रकल्प मंजूर करण्यासाठी आणि अपूर्णावस्थेत असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, अंशत: खरे आहे.

महामंडळांतर्गत जून, २०२४ अखेर एकूण ८५८ सिंचन प्रकल्पांपैकी ७५८ सिंचन प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. या प्रकल्पांची अंतिम सिंचन क्षमता २२.३१ लक्ष हे. इतकी असून, २०२४ अखेर पूर्ण व बांधकामाधीन प्रकल्पांवर १४.२३ लक्ष हे.(६४%) इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.

उर्वरित १०० सिंचन प्रकल्पांपैकी १३ प्रकल्पांना वनजमीन मान्यता व इतर कारणाने त्यांची प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली असल्याने या प्रकल्पांची कामे सुरु होऊ शकली नाहीत.
त्यामुळे सद्यःस्थितीत ८७ सिंचन प्रकल्प प्रगतीपथावर आहे. त्यापैकी १२ प्रकल्प वनजमीन व इतर कारणांनी त्यांची कामे प्रलंबित आहेत. या ८७ प्रकल्पांची अंतिम सिंचन क्षमता १२.६० लक्ष हे. इतकी असून जून, २०२४ अखेर ४.८१ लक्ष हे. इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.
(३) श्वेतपत्रिका निर्गमित करण्याचे प्रयोजन नाही.
(४) विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्पांना केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, बळीराजा जलसंजीवनी योजना, नाबार्ड (RIDF) अंतर्गत विविध मालिका, नाबार्ड (NIDA) अंतर्गत कर्ज सहाय्य व शासन अंशदान इ. विविध स्त्रोतातून निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार व मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशातील निधी वाटपाच्या सूत्रानुसार सिंचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमधील कर्मचाऱ्यांचे वेतन एक तारखेला होणेबाबत

**(२) * २८४२ श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अंशतः अनुदानित माध्यमिक शाळा, माध्यमिक तुकड्या, कनिष्ठ महाविद्यालय, अंशतः अनुदानित शाळा व तुकड्या, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळा इत्यादी शाळांच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित अदा होत नाही तसेच मुंबईतील अनुदानित शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मागील ३ ते ४ महिन्यांपासून १ तारखेला वेतन त्यांच्या बँक

खात्यामध्ये जमा होत नसल्याचे तसेच अंशतः अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे माहे फेब्रुवारी, २०२५ चे नियमित वेतन निधीअभावी प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या प्लॅन व नॉन प्लॅन अशा दोन प्रकारच्या शाळा असून प्लॅन मधील शाळांना वेळेत बजेट उपलब्ध होत नाही, त्यामुळे वेतन वितरीत करण्यास विलंब होत असून शिक्षकांचे कर्जाचे हप्ते, विविध गुंतवणुकीतील मासिक वर्गणी इत्यादींचा भरणा करण्यास विलंब झाल्याने शिक्षकांना दंडाची आकारणी भरावी लागत असून ०५११ लेखाशीर्ष अंतर्गत शिक्षकांचे विविध प्रकारची थकीत देयके संचालक स्तरावरून मंजूर होऊनही निधी अभावी अदा करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकांच्या व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन वितरणास झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत तसेच ३३६१, ३२६१, ३३७९, ०५११,१९०१,H९७३ इत्यादी लेखाशीर्षांतर्गत वेतन निधीची तरतूद नियमित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांचे लेखाशीर्षतर्गंत अनुदान आदिवासी विभागाकडून प्राप्त होत असल्याने वेतन अनुदान वितरीत करण्यास विलंब होतो. मंजूर अनुदान नियमित वेतनासाठी कमी पडत असल्याने सन २०२४-२५ मध्ये लेखाशीर्ष २२०२०५११ मध्ये थकीत देयक अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली नाही.
(३) आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये तरतुद पुरेशी नसल्याने पुरवणी मागणीव्दारे व पुर्नविनियोजनाव्दारे तरतूद उपलब्ध करुन माहे फेब्रुवारी, २०२५ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले आहे. लेखाशीर्ष २२०२०५११ अंतर्गत काही उच्च माध्यमिक शाळांचे वेतन पूर्ण अदा होऊ शकले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाची शैक्षणिक फीची प्रतिपुर्ती मिळणेबाबत

**(३) * ३२१२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची शैक्षणिक फी प्रतिपुर्ती शिक्षण शुल्क समितीच्या मान्य केलेल्या शुल्कानुसार दिली जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्काप्रमाणे फी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक १९/०८/१९९५ मधील परिशिष्ट “अ (५)(२)”

अन्वये शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमाबाबत सदर सवलत मान्यताप्राप्त संस्थेतील "फ्री सीट" मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणित फी पुरतीच अनुज्ञेय असून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १६/०३/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचे दर निश्चित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लघु सिंचन विभागाच्या तलावांमधील गाळ उपसा करून पाणी साठवण क्षमता वाढविण्याबाबत तसेच अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(४) * ३३६८ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लघु सिंचन विभागाच्या अखत्यारीतील तलावांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे त्यांची पाणी साठवण क्षमता घटली असून, महानगरपालिका व जिल्ह्याची ठिकाणे तसेच मोठ्या शहराच्या २५ किलोमीटरच्या परिघातील अनेक ठिकाणी मोठे व्यावसायिक आणि बांधकाम व्यावसायिक या तलावांच्या जागांवर अतिक्रमण करित असल्याच्या तक्रारी संबंधित विभागाकडे वारंवार करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अतिक्रमणामुळे मासेमारी करणाऱ्या स्थानिक सोसायट्यांवर विस्थापित होण्याची वेळ आली असून त्यांच्या रोजगाराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लघु सिंचन विभागाच्या अखत्यारीतील तलावांमधील गाळ उपसा करून पाणी साठवण क्षमता वाढविण्याबाबत तसेच तेथील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ज्या लघु सिंचन प्रकल्पांमध्ये गाळ साचलेला आहे अशा ठिकाणी मृद व जलसंधारण विभागामार्फत गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत गाळ काढण्याची कार्यवाही करण्यात येते.
तसेच ज्या लघुसिंचन प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये अतिक्रमण झालेले आहे, अशा ठिकाणी प्रचलित शासन नियमाप्रमाणे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत गणवेशाचे वाटप केले नसल्याबाबत

**(५) * २५६५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील २२ हजार विद्यार्थ्यांना महिला आर्थिक विकास महामंडळाने गणवेशाचे वाटप केले नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेने गणवेश दिले परंतु महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे दिले जाणारे गणवेश विद्यार्थांना मिळालेले नसल्याने विद्यार्थ्यांना यावर्षी एकाच गणवेशामध्ये शाळेत जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांना गणवेशापासून वंचित ठेवणाऱ्या व गणवेश वाटपासाठी देण्यात आलेल्या निधीमध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या महिला आर्थिक विकास महामंडळातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) अंशत: हे खरे आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये मोफत गणवेश योजनेंतर्गत दोन गणवेशापैकी नियमित एक गणवेश महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत तसेच, स्काऊट व गाईड अनुरूप दुसरा गणवेश संबंधित शाळा व्यवस्थापन समितीमार्फत शिलाई करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.त्यानुषंगाने पालघर जिल्ह्यातील सर्व लाभार्थ्यांना स्काऊट व गाईड अनुरूप गणवेशाचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीद्वारे देण्यात आला आहे. तथापि, महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत सद्य:स्थितीत एकूण १,६०,९१७ विद्यार्थ्यांपैकी १,४१,२५८ विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ देण्यात आला आहे.
(३) व (४) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, पालघर यांच्या स्तरावरून महिला आर्थिक विकास महामंडळाला कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील ताडाळी येथील धारीवाल पॉवर स्टेशनच्या पाईपलाइनमुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत

**(६) * २५९५ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ६०० मेगावॅट क्षमतेच्या धारीवाल पॉवर स्टेशनला जलसंपदा विभागाने वर्धा नदीमधील पाणी वापरण्यास व जिल्हाधिकाऱ्यांनी पॉवर स्टेशनपर्यंत पाणी वाहून नेण्यासाठी शिवधुऱ्यावरुन पाईप लाईन टाकण्यास परवानगी दिली असल्याचे माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने शिवधुऱ्यासह शेतातूनही सुमारे २० कि.मी.लांब पाईपलाईन टाकली असून सदर पाईपलाईन अनेकदा फुटल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माहिती व निर्णय घेवून येथील बाधित शेतकऱ्यांना ४ हजार ४४४ रुपये मीटर नुसार नुकसान भरपाई देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

मे.धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीच्या चंद्रपूर जिल्ह्यातील ६०० मेगावॅट क्षमतेच्या विद्युत निर्मिती प्रकल्पाकरीता १९.२७ द.ल.घ.मी. इतक्या पाण्याची वर्धा नदीतून वार्षिक पाणी उचल करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक १६ जून, २०११ च्या आदेशान्वये, इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीच्या मौजा धानोरा, वढा, पांढरकवडा, महाकुर्ला, अंतुर्ला, शेणगांव, सोनेगांव, येरूर, गवराळा या गावांतील मंजूर मार्गाने पाईपलाईन टाकण्यास परवानगी देवून कंपनीसोबत करारनामा केला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०२४-२५ मध्ये आदेशित गावातील काही शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने प्रकरणात केलेल्या चौकशीअंती धारीवाल कंपनीने वर्धा नदी ते विद्युत निर्मिती प्रकल्पापर्यंत पाईपलाईन मंजूर मार्गाने न टाकता काही खाजगी शेतजमिनीतून टाकल्याचे दिसून आले. तसेच पाईपलाईनच्या गळतीमुळे काही शेतकऱ्यांच्या पीकांचे नुकसान झाल्याचे आढळून आले आहे.

(३) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयाकडून चौकशी करून दिनांक १८/०३/२०२५ रोजी आदेश पारीत केले असून मे.धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीस खाजगी शेतजमिनीतून गेलेली पाईपलाईन काढून १५ महिन्याच्या आत मूळ आदेशाप्रमाणे मंजूर मार्गाने २ मीटर खोलातून टाकणे तसेच यासंदर्भात गठीत केलेल्या संयुक्त समितीच्या अहवालानुसार कंपनीने पाईपलाईन गळतीमुळे शेतपिकांचे झालेल्या नुकसानीचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना देणेबाबत आदेशित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या योजनेंतर्गत इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या वर्गातील मागासवर्गीय मुलींना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत

**(७) * २३८० श्री.सुनिल शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.संदीप जोशी, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले योजनेंतर्गत अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त समाजातील इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थींनींची उपस्थिती ७५ टक्क्यांपेक्षा अधिक असेल अशा विद्यार्थींनींना उपस्थित दिवसांकरीता प्रतिदिन १ रुपया दैनिक भत्ता देण्याबाबतचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने दिनांक १० जानेवारी, १९९२ रोजी घेतला असून, सन १९९२ पासून मुलींना शासनाकडून प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ३१ वर्षांपासून सदर प्रोत्साहन भत्त्यात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही, हा भत्ता अत्यंत अपूरा आणि नाममात्र असल्याने सन २०२१ मध्ये मंत्रिमंडळाने या भत्त्यात पाच रुपये वाढ करण्याची शिफारस केली होती, परंतु चार वर्ष होवूनही अदयापपर्यंत शासनाने याबाबत निर्णय घेतला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजच्या महागाईच्या तुलनेत सध्याच्या काळात दिला जाणारा नाममात्र १ रुपया उपस्थिती भत्ता अत्यंत अपूरा असल्याने शासनाने प्रतिदिन १० रुपये प्रोत्साहन भत्ता द्यावा अशी मागणी राज्य शिक्षक समितीने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू उपस्थिती भत्यात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) इयत्ता १ ली ते ४ थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील सर्व मुली व आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती / जमातीच्या दारिद्रय रेषेखालील पालकांच्या मुली या लाभार्थी आहेत.

राज्यात सद्य:स्थितीत मुलींची शाळेतील उपस्थिती वाढविण्यासाठी केंद्र/राज्य पुरस्कृत विविध नवीन योजना उदा. मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठयपुस्तके योजना, मोफत गणवेष योजना, विविध शिष्यवृत्त्या, वाहतूक भत्ता, मुलींसाठी वस्तीगृह व आश्रम शाळा, कस्तुरबा गांधी विद्यालय, अशा अधिक प्रभावी नवीन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. तसेच मानव विकास मिशनमार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना व मोफत ST प्रवास योजना राबविण्यात येते. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत आहे.

तसेच, सदर योजना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १३ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना (DPC) कडे वर्ग करण्यात आलेली आहे. सदर योजनेला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील आर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८)** * **३१४३ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ३ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, आर्वी यांचे तक्रारीनुसार सदरच्या गैरव्यवहाराची चौकशी करून तसेच संबंधित दोषींवर कारवाई करून कृषी उत्पन्न बाजार समिती आर्वी बरखास्त करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी मा.पणन मंत्री यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच आर्वी कृषी उत्पन्न बाजार समिती बरखास्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.

सदर तक्रार दिनांक १३/०४/२०२५ व दिनांक २५/०४/२०२५ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) व (३) प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन), अधिनियम, १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतूदीनुसार सहायक निबंधक व लेखापरिक्षक वर्ग-१ यांची दिनांक २१/०४/२०२५ रोजी चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांद्वारे नियमबाह्य शिक्षक व कर्मचारी भरतीप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(९) * ३४४२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१७ मध्ये शैक्षणिक संस्थांना धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्यासाठी एक महत्त्वाचा शासन निर्णय काढण्यात आला असून, सदर शासन निर्णयाच्या आधारे अनेक शैक्षणिक संस्थांनी अल्पसंख्याक दर्जा प्राप्त केला असल्याचे तसेच गडचिरोलीत ५० हून अधिक शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ नंतर शिक्षक भरतीवर बंदी घालण्यात आल्यानंतर अल्पसंख्याक शाळांमध्ये पदभरती प्रक्रियेत आरक्षणाचे नियम डावलून मोठ्या प्रमाणावर शिक्षक व कर्मचारी भरती करून आरक्षित गटांवर उमेदवारांवर अन्याय केला असून, अल्पसंख्याक शाळांमधील सदर भरती प्रक्रियेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक संस्थांमधील भरती प्रक्रियेच्या स्पर्धेत धनाढ्य उमेदवार असतात व याचा फायदा संस्थाचालक घेत असल्याचे निदर्शनास आले आहे व या प्रक्रियेमुळे आरक्षण धोरणाला बाधा येत असून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय गटातील उमेदवारांना संधी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व नियमबाह्य शिक्षक व कर्मचारी भरती रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच सदर नियमबाहय भरती प्रक्रिया करणाऱ्या संबंधित दोषी शिक्षक व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना दिनांक २७/५/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा देण्यात येतो. विभागामार्फत सन २०१७ पासून गडचिरोली जिल्ह्यातील एकूण १४ शैक्षणिक संस्थांना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

राज्यातील अनुदानित व विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भरतीमध्ये कोणत्याही प्रकारचे आरक्षण लागू करता येणार नाही, असे धोरण या विभागाच्या दिनांक ०४/०५/२००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित करण्यात आले आहे.

तसेच शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २३/६/२०१७ च्या शासन निर्णयानुसार खाजगी संस्थांच्या शाळांमध्ये पवित्र प्रणालीद्वारे भरती प्रक्रीया सुरु असून अल्पसंख्याक संस्थांना सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार पवित्र प्रणाली लागू नाही. अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्थांना बिंदुनामावली लागू नसल्याने कोणत्या प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती करावी याबाबत कोणतेही निकष नसल्याने शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवाराची नियुक्ती अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्था करु शकतात. तसेच अनुसुचित जाती/जमाती व इतर मागासवर्ग गटातील उमेदवारांना न्याय मिळत नाही असे म्हणणे उचित ठरणार नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्याच्या शिराळा तालुक्यातील वाकुर्डे बुद्रुक योजनेमधील गावे पाण्यापासून वंचित असल्याबाबत

**(१०) * २८३८ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील वाकुर्डे बुद्रुक योजना अद्यापि अपूर्ण असल्याने सुरूल, घबकवाडी, खोतवाडी, ओझर्डे माणिकवाडी, महादेव वाडी या डोंगर भागातील गावांना अजूनही या योजनेचे पाणी मिळाले नसल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाकुर्डे योजनेच्या कामांचा अंतिम सर्व्हे करून वरील गावातील शेतीला पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर गावापैकी सुरुल, ओझर्डे, घबकवाडी इ. गावांना सुरूल शाखेद्वारे सिंचन हंगाम सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ मध्ये अंशत: पाणी देण्यात आले आहे व इतर दोन गावांसाठीची कामे पूर्ण करून माणिकवाडी व महादेववाडी या गावांना पाणी देण्याचे नियोजित आहे. खोतवाडी हे स्वतंत्र महसूली गावठाण नसून ते घबकवाडी या गावचा भाग आहे.

(२) सद्य:स्थितीत वाकुर्डे उपसा सिंचन योजनेचे काम चालु आहे. त्यामुळे वर नमुद तीन गावातील काही गटांना पाणी देण्यात आलेले असून प्रकल्पात समाविष्ठ या तीन गावातील उर्वरीत गटांना व इतर दोन गावांना प्रकल्पातंर्गत कामे पूर्ण झालेनंतर पाणी देण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील मे. रॉकिंग बॉम्बे ब्रेवरेज कंपनीस पाताळगंगा नदीतून पाण्याचा कोटा मंजूर केल्याबाबत

**(११) * २७३९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील मे. रॉकिंग बॉम्बे ब्रेवरेज या मद्य कंपनीस जलसंपदा विभागाने पाताळगंगा नदीतून दररोज १२० दशलक्ष लीटर व वार्षिक ०.३९३२ दशलक्ष घनमीटर पाणी कोटा मंजूर करण्यात आला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील जवळपास १०६ वाड्या व २१ गावांना तीव्र पाणी टंचाई असून २५ खाजगी टँकर्सनी पाणीपुरवठा केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असताना व टँकरने पाणीपुरवठा होत असताना मद्य कंपनीस पातळगंगा नदीतून पाणी कोटा मंजूर करणाऱ्या जलसंपदा विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

मे. रॉकिंग बॉम्बे ब्रेवरेज मौजे खानाव, ता.खालापुर, जि.रायगड या ग्राहकास १.२० दललि/दिन (०.३९३२ दलघमी) इतका पाणीवापर औद्योगिक कारणाकरीता शासन निर्णय क्र.बिसिंआ २०२५/(६०/२५) सिं.व्य.(धो-२), दिनांक १७/०४/२०२५ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पाताळगंगा नदीतुन मागणीनुसार स्थानिक ग्रामपंचायती यांना पाणी कोटा मंजूर करण्यात आलेला आहे. राज्य जलनितीनुसार पिण्याचे पाणी प्रथम प्राधान्याने आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागणी केल्यास त्यांना पातळगंगा नदीतून पाणी आरक्षित करण्यात येईल.

उर्वरित पाण्यातून मे. रॉकिंग बॉम्बे ब्रेवरेज कंपनीस पाणी कोटा मंजुरी देण्यात आलेली असल्यामुळे संबंधित अधिकारी- कर्मचारी यांच्यावर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फुल बाजारातील इमारतीचे बांधकाम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(१२) * २६४३ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फुल बाजारासाठी बांधण्यात येणाऱ्या इमारतीचे बांधकाम अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२५ मध्ये पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट देऊन फुल बाजाराच्या इमारतीचे काम शंभर दिवसात पूर्ण करा अशी सूचना मा.पणन मंत्री यांनी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतील फुल बाजारासाठी बांधण्यात येणाऱ्या इमारतीस सुरुवातीला ५४ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असताना सदर इमारतीचे बांधकाम करण्यास विलंब होत असल्याने तो खर्च रुपये ११६ कोटींवर गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फुल बाजारासाठीच्या इमारत बांधकामास विलंब करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती येथील मूळ प्रकल्पात व्यापाऱ्यांच्या मागणी वरून बदल होऊन अतिरिक्त २ मजले व पार्किंगकरीता १ अतिरिक्त तळमजला बांधण्याबाबत प्रकल्पात बदल झाल्यामुळे बांधकाम आजपावेतो सुरू आहे.
(२) होय, हे खरे आहे,

मंत्री (पणन) यांनी बाजार समितीस दिनांक १०/०१/२०२५ रोजी भेट दिली असता त्यावेळी पाहणी अंती प्रकल्पाचे काम जलदरित्या पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या आहेत.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

सदर मूळ प्रकल्पात व्यापाऱ्यांच्या मागणीनुसार इमारतीचे गाळयांची उंची वाढवणे, गाळयांची संख्या २५२ वरून ४३७ करण्यात आली, लिफ्टच्या संख्येत वाढ, मध्यवर्ती वातानुकुलन यंत्रणेची योजना इ. या खर्चात वाढ विलंबामुळे झाला नसून बांधकाम खर्च वाढीमुळे ५४ कोटी वरून ११६ कोटी झालेला आहे. तसेच या प्रकरणी बांधकाम सुरु असल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१३) * २७०५ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण विभागाच्या समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत शाळेचे बांधकाम व दुरुस्तीकरीता शासन निधी देत असूनही ता.कळमनुरी, जि.हिंगोली येथील १०० जिल्हा परिषद शाळांच्या वर्गांची दुरुस्ती झाली नसल्याने त्या मोडकळीस आल्या असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थी येण्याकरीता शासन विविध उपक्रम राबवीत आहे, परंतु शिक्षण विभाग शाळेच्या मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या दुरुस्त करण्याकडे दुर्लक्ष करित असल्याने अशा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पाठविण्यास पालक तयार होत नसून, त्यांना आर्थिक परिस्थिती नसतानाही मुलांना अन्य शाळांमध्ये शिक्षणाकरीता पाठवावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण विभागाच्या समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत शाळेचे बांधकाम व दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन जिल्हा परिषदेच्या वर्ग खोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

सन २०२४-२५ नुसार ४० शाळांमध्ये वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत, दुरूस्तीचे आवश्यकता असलेल्या ३९ शाळांच्या दुरूस्तीकरीतेचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

समग्र शिक्षा अंतर्गत एकूण २८ शाळांची दुरूस्ती करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२५-२६ करीता युडायस विद्यार्थी संख्या ३९ शाळांना दुरूस्तीची मागणी डी.पी.सी. प्रस्तावीत करण्यात येत आहे व समग्र शिक्षा अभियान अंतर्गत प्रबंध पोर्टलवर मागणी दर्शविण्यात आली आहे. निधी उपलब्ध झाल्यावर कामे पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये सौर शाळा योजना राबविण्याबाबत

**(१४) * २७४५ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हापरिषदेच्या शाळांच्या वीज देयकांच्या थकबाकीमुळे वीज कापण्यात आली होती, शाळेत वीज नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याने अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी सौर शाळा तयार करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डिजिटल शिक्षण, शैक्षणिक साहित्य, संगणक व प्रयोगशाळा, स्मार्ट टीव्ही, ई-लर्निंगसारख्या आधुनिक सुविधा गावांमध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेत सौर शाळा योजना राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याअनुषंगाने सौर शाळा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय, दिनांक ०४.जून, २०२० अन्वये इतर निधीतुन विज बील भरले नसल्यास सादील अनुदानातून खर्च भागविण्यात येतो.

थकीत वीज देयक अदा करणेसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी सादील अनुदानातून रुपये १३.३९ कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच, सन २०२५-२६ करीता उर्वरीत थकीत वीज देयक अदा करण्यासाठी रुपये १८.४३ कोटी इतक्या रक्कमेचा निधी वितरणाबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(२) व (३) समग्र शिक्षा अंतर्गत अति दुर्गम भागातील शाळांमध्ये जेथे विद्यूत सुविधा पोहचली नाही अशा शाळांना सौर ऊर्जाची सुविधा मंजूर करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यात सोयाबीन खरेदीत अनियमितता झाल्याबाबत

**(१५) * २८९५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरळ (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील सोयाबीन खरेदीत अनियमितता झाल्याने संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांविरुध्द पोलिसांत तक्रार करुन गुन्हा दाखल केल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोयाबीन खरेदी केल्यानंतर विनाविलंब महाराष्ट्र राज्य साखर महामंडळाच्या गोदामात ते जमा करणे गरजेचे असून त्याच्या वेअर हाऊस पावत्या व इतर माहिती जिल्हा पणन कार्यालयात जमा करावी लागते, तसेच ही माहिती तेथून "नाफेड"कडे जाते व त्या आधारावर शेतकऱ्यांना पैशांचा मोबदला दिला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२४-२५ च्या हंगामात शेतकरी कंपनीने १९ हजार ७२३.९२ क्विंटल सोयाबीन खरेदी केले, त्यापोटी वेअरहाऊसच्या १८ हजार ४२६ क्विंटल ९२ किलोच्या पावत्या पणन कार्यालयात जमा केल्याचे दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू कंपनीने शासनाच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक करुन ६३ लाख ४४ हजार ९२४ रुपयांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोयाबीन खरेदीत अनियमितता करणाऱ्या अंदुरा ॲग्रो प्रोडयुसर कंपनीच्या संबंधित दोषी संचालकाविरुध कोणती कारवाई केली तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४) हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार नाफेडच्या वतीने अकोला जिल्ह्यात सोयाबीन खरेदीत अंदुरा ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी, अंदुरा यांनी खरेदी कालावधीत ऑनलाईन १९,७२३.९२ क्विंटल सोयाबीन खरेदी केले असून त्यापैकी १८,४४७.५५ क्विंटलच्या वखार पावत्या नाफेड कार्यालयास सादर केल्या. तथापि, सदर संस्थेने उर्वरित १२९७ क्विंटल खरेदीची नोंद पोर्टलवर घेऊन सोयाबीन वखार महामंडळाच्या गोदामात जमा केला नाही. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना नाफेडकडून शेतकरी चुकारे अदा केले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करून शेतकऱ्यांची फसवणुक केल्याप्रकरणी संस्थेचे संचालक व इतर ११ यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन उरळ ता.बाळापूर, जि.अकोला येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) अंदुरा ॲग्रो प्रोड्यूसर कंपनीने हंगाम २०२४-२५ मध्ये सोयाबीन खरेदीत अनियमितता केल्याप्रकरणी संस्थेस काळ्या यादीत टाकून केंद्र व राज्यशासनाच्या कोणत्याही खरेदी प्रक्रियेत समाविष्ट करण्यास प्रतिबंध

करण्यात आला आहे. शेतकऱ्यांची देयके अदा करण्यासंदर्भात संस्थेस देय असलेली सर्व रक्कम रोखुन ठेवण्यात आली आहे. तसेच अंदुरा ॲग्रो प्रो.कं. या खरेदी केंद्राची अनामत रक्कम जप्त करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील शाळांना पोषण आहार वेळेत पुरविण्यात येत नसल्याबाबत

**(१६) * २४२२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेणारे ६० हजारांहून अधिक विद्यार्थी असून शासनाने नियुक्त केलेल्या पुरवठादारांनी शाळांना तांदुळ व इतर साहित्याचा पुरवठा गेल्या दहा दिवसांपासून न केल्यामुळे सदर विद्यार्थी पोषण आहाराविना असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरवठादारांकडून शाळांना पोषण आहार वेळेत न पुरविण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोषण आहार वेळेत न पुरविणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२), (३) व (४) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत गोंदिया जिल्ह्यामध्ये एकूण १३४० शाळांमधील १,०८,०४३ विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ दिला जातो. गोंदिया जिल्ह्यामध्ये माहे डिसेंबर, २०२५ अखेरीस शाळा स्तरावरील शिल्लक तांदूळ साठा विचारात घेवून माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२५ महिन्यासाठी तांदूळ मंजूर करण्यात आला होता.तथापि, शाळा स्तरावरील शिल्लक तांदूळ व कार्यदिन याची परिगणना व्यवस्थित न झाल्याने माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये अर्जुनी मोरगाव व तिरोडा तालुक्यातील २६ शाळांमध्ये तांदुळ तुटवडा निर्माण झाला होता.प्रस्तुत कालावधीत सदर २६ शाळांनी उसनवारी तत्त्वावर तांदुळ घेवून विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ दिलेला आहे. तसेच, प्रस्तुत २६ शाळांच्या मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस देण्याबाबत संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील म्हाडा गृहप्रकल्पातील मदरशाचे अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(१७) * ३४९३ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली पश्चिम चारकोप येथे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गरजूंसाठी म्हाडाने जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने गृह प्रकल्प राबविला असून, या प्रकल्पातील सेक्टर १ मधील नशेमन सहकारी

गृहनिर्माण संस्थेमधील १४, १५ व १६ क्रमांकाच्या तीन खोल्या एकत्र करुन मदरशाचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आल्यानंतर म्हाडाने सदर मदरशाचे अतिक्रमण निष्कासित करण्याची नोटीस बजाविली असून या नोटीसीविरुध्द संबंधित संस्थेने वक्फ प्राधिकरणाकडून अंतरिम स्थगिती मिळविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वक्फ कायद्याचा दुरुपयोग करुन वक्फ प्राधिकरणाला नसलेले अधिकार वापरुन बेकायदेशीर मदरशाला संरक्षण मिळविण्याचे प्रकार रोखण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनाला केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वक्फ कायद्याचा दुरुपयोग करुन प्राधिकरणाला नसलेले अधिकार वापरुन बेकायदेशीर मदरशाला संरक्षण मिळवून देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच अनधिकृत मदशाचे बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे आहे.
(२) अशा प्रकारचे निवेदन या कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.
उम्मीद अधिनियम, १९९५ मधील कलम ८३ अन्वये वक्फ न्यायाधिकरणास वादीत वक्फ मालमत्तांबाबत सुनावणी घेण्याचे अधिकार आहेत.
(३) म्हाडाने दिलेल्या नोटीशीस वक्फ न्यायाधिकरणाने स्थगिती दिलेली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सबब, सद्य:स्थितीत या प्रकरणी कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अनधिकृत मदरशांचे बांधकाम हटविण्याबाबत प्रचलित कायद्यांतील तरतूदीद्वारे कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा येथील जनसेवा को-ऑपरेटीव्ह बँकेने कर्ज मंजूरीमध्ये अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१८) * ३००१ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जनसेवा को- ऑपरेटीव्ह बँक, सातारा यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये कर्ज देतांना शहानिशा न करता कर्जाचे वाटप केलेले असून त्यामध्ये शेंद्रे (ता.सातारा) येथील शेत जमिनीची शासकीय किंमत न तपासता रुपये ९ कोटी ५० लक्ष एवढे कर्ज दिले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्ज मंजूरीसाठी आवश्यक असलेले मुल्यांकन रिपोर्ट (व्हॅल्युएशन), सर्च रिपोर्ट आणि आयटीआर तपासणी न करता सदर कर्ज घेतांना श्री.मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारावर कर्ज घेऊन कोटयवधी रुपयांचा जमीन कर्ज गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमीन कर्ज गैरव्यवहार बँकेचे तत्कालिन मॅनेजर व कर्जदार श्री.मोरे व सातारा डीडीआर यांनी संगनमताने केलेला असून, बँकेच्या निधीचा अपहार व पैशांची अफरातफर या आर्थिक

गैरव्यवहाराबाबत तसेच बँकेच्या अनियमिततेबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) व (२) खरे नाही.

सदर प्रकरण जनसेवा को-ऑप बँक, सातारा या बँकेशी संबंधित नाही. जनसेवा सहकारी बँक लि. हडपसर, पुणे या बँकेच्या दिनांक १२/११/२०२४ रोजीच्या संचालक मंडळ सभेमधील ठराव क्र.३/३/११ अन्वये शिक्रापूर व पिंरगुट शाखेकडून एकत्रित रुपये ९३६.५९ लाख इतके कर्ज मंजूर केले आहे. सदर कर्ज मे. तिरुपती आर.एम.सी.कॉर्पोरेशन या भागीदारी फर्मला, मंजूर करण्यात आले आहे. कर्ज मंजूरीसाठी आवश्यक असलेले मुल्यांकन रिपोर्ट (व्हॅल्युएशन), सर्च रिपोर्ट आणि भागीदारांचे आयटीआर, कर्जदार भागीदारी फर्मचा प्रकल्प अहवाल इत्यादी मूळ कागदपत्रे बॅकेच्या पिरंगुट शाखेच्या दप्तरी उपलब्ध आहेत. त्यामुळे कागदपत्रांची उचित शहानिशा व तपासणी केल्याबाबतचा अहवाल जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, पुणे यांनी दिला आहे.
(३) हे खरे नाही.

बँकेमध्ये कोणताही आर्थिक गैरव्यवहार, पैशांची अफरातफर, निधीचा अपहार झाल्याचे दिसून येत नाही.

कोणत्याही सहकारी बँकेत अथवा वित्तीय संस्थेतील कर्ज मंजूर/ नामंजूर करणे, वाटप करणे हे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यकक्षेचा भाग नाही. सदर बाब पूर्णत: बँक संचालक मंडळ / व्यवस्थापन समिती / मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापक यांच्या कार्यकक्षेत येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील भाईचंद हिराचंद रायसोनी पतसंस्थेतील अनियमितता आणि गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१९) * २८७१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील भाईचंद हिराचंद रायसोनी (बीएचआर) पतसंस्थेच्या २४६ कोटींच्या कर्जापोटी एकरकमी परतफेड योजनेंतर्गत १८९ कोटी रुपयांची सुट दिली आहे, तसेच अवसायक नियुक्त असतानाही गेल्या ८ वर्षांपासून लेखापरीक्षण केलेले नाही, वाहन खर्च व प्रवास भत्त्यावर अनावश्यक खर्च केला असलेबाबत चौकशी समितीने दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी सहकार आयुक्तांना अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जळगाव जिल्ह्यातील भाईचंद हिराचंद रायसोनी (बीएचआर) पतसंस्थेच्या चौकशी समितीच्या अहवालानुसार गत ८ वर्षांपासून लेखापरीक्षण न करता तसेच वाहन खर्च व प्रवास भत्त्यावर अनावश्यक खर्च करणाऱ्या संबंधित अवसायाकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४(४) अन्वये लवाद नियुक्त करणे व कलम १०८ अन्वये बहुराज्यीय संस्थांची तपासणी करण्या व्यतिरिक्त इतर कोणतेही अधिकार राज्याचे निबंधक यांना नाहीत. त्याप्रमाणे सदरहु संस्थेची दिनांक १०/०१/२०२५ रोजीचे आदेशान्वये दिनांक ०८/०३/२०२१ ते ०४/०९/२०२४ या कालावधीची तपासणी करणेकामी कलम १०८ अन्वये सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदेश निर्गमित केला आहे.

तपासणी अहवालामध्ये नमुद मुद्यांवर कारवाई करण्याचे अधिकार तसेच संस्थेचे लेखापरीक्षण करणेसाठी लेखापरीक्षक नियुक्तीचे अधिकार राज्याचे निबंधक यांना नसल्यामुळे प्रस्तुतचा तपासणी अहवाल पुढील कार्यवाहीसाठी मा.केंद्रीय निबंधक, नवी दिल्ली यांना दिनांक ०५/०६/२०२५ रोजी पाठविण्यात आला आहे.

(३) लागू नाही.

-----------------

## अहिल्यानगरसह धुळे, जळगाव, नंदुरबार व नाशिक येथील माध्यमिक वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालयांमध्ये अनियमितता होत असल्याबाबत

**(२०) * २९२० श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालय, अहिल्यानगर येथील कार्यालयातील लिपिकास लाच घेताना अटक करण्यात आली असून माध्यमिक वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालय, धुळे येथे अधीक्षक यांना लाच घेताना अटक करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर/धुळे/जळगाव/नंदुरबार/नाशिक येथील माध्यमिक वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालयात नियमित कामे करण्यासाठी पैशाची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने भविष्य निर्वाह निधी कार्यालयात लाच घेणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) लाचेच्या मागणीप्रकरणी माध्यमिक वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालय, अहिल्यानगर कार्यालयातील सहायक लेखाधिकारी यांना दिनांक १८/०२/२०२५ रोजी अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्य.), जि.प. धुळे कार्यालयातील प्रभारी अधीक्षक यांना लाचलुचपत सापळा प्रकरणात दिनांक २१/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द धुळे शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याप्रकरणी जिल्हा परिषद अहिल्यानगर व धुळे येथील संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडून झालेल्या सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने त्यांना शासन सेवेतून निलंबित

करण्यात आलेले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दि म्युनिसिपल बँकेच्या वांद्रे शाखेस महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याने कर्ज प्रकरणी बनावट ना-हरकत प्रमाणपत्र दिल्याबाबत

**(२१) * ३५५७ श्री.संजय केणेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि म्युनिसिपल बँकेच्या वांद्रे येथील शाखेतून एका सावकाराने बनावट सीबीलची एनओसी सादर करून पालिका कामगारास कर्ज मिळवून दिल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालिका कामगाराने सावकाराविरोधात मुंबई पोलीस आयुक्त, सहकार विभाग यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेत कर्मचारी असलेल्या आणि बेकायदेशीर सावकाराचा व्यवसाय करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची मागणी म्युनिसिपल मजदूर संघाचे उपाध्यक्ष यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महापालिकेत कर्मचारी असलेल्या आणि बेकायदेशीर सावकाराचा व्यवसाय करणाऱ्या संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

दि म्युनिसिपल बँकेच्या वांद्रे शाखेच्या लोन कमिटीने श्री.राजेश कांबळे यांना दिनांक ३०/०१/२०२५ रोजी रुपये १५.५० लाख इतके कर्ज मंजूर केले आहे.

सदर कर्जासाठी श्री.कांबळे यांनी बनावट ना-हरकत प्रमाणपत्र सादर केल्याचे बँकेच्या निर्दशनास आले आहे. त्याअनुषंगाने बँकेच्या बांद्रा शाखा व्यवस्थापिका यांनी बांद्रा पोलीस स्टेशन येथे दिनांक ०९/०४/२०२५ रोजी तक्रार दाखल केली आहे.

(२) हे खरे आहे.

श्री.रुपेश पुरळकर या पालिका कामगाराने श्री.बिपिन चौहान यांच्याविरोधात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर-१ यांच्याकडे दिनांक २१/०२/२०२५ रोजी तक्रार दाखल केली आहे.

(३) हे खरे नाही.

म्युनिसिपल मजदूर संघाचे उपाध्यक्ष यांची बेकायदेशीर सावकाराचा व्यवसाय करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याबाबतची मागणी शासनास प्राप्त नाही.

(४) श्री.रुपेश पुरळकर या पालिका कामगाराने श्री.बिपिन चौहान यांच्याविरुध्द दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपनिबंधक, सहकारी संस्था, अे विभाग, मुंबई यांच्याकडून कार्यवाही सुरू आहे. यासंबंधी दिनांक ०८/०५/२०२५ व दिनांक १७/०६/२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीस दोन्ही पक्षकार उपस्थित राहिले नसल्यामुळे पुन्हा सुनावणी घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत देण्यात आलेल्या संकेतस्थळावर वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्याबाबत

**(२२) * ३६६१ ॲड.अनिल परब, श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेकरीता देण्यात आलेल्या संकेतस्थळावर वारंवार तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात बदल करावा लागला असून महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने आयुक्त (शिक्षण), पुणे यांना दिनांक २९ मे,२०२५ रोजी निवेदन पाठवून समस्या निकाली काढण्याची विनंती केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकरावी प्रवेशासाठीच्या अधिकृत संकेतस्थळात तांत्रिक बिघाड झाल्याने (वेबसाईट सतत डाऊन होते, एरर दाखवते) अर्ज नोंदणीला उशिर होत असल्याने अकरावीची ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया रखडण्याची स्थिती निर्माण झाली असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि पालकांना यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षण विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत तांत्रिक अडचणींमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी तसेच आयुक्त संचालक, पुणे यांना दिनांक २९ मे,२०२५ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तालुका स्तरावर सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) आणि (२) अंशत: खरे आहे.

(३) सन २०२५-२६ पासून प्रथमच संपूर्ण राज्यात इयत्ता ११ वी प्रवेश प्रकिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. यामध्ये ग्रामीण भाग सुध्दा समाविष्ट झाल्याने जवळपास ९४३५ हजार कनिष्ठ महाविद्यालयांची २१२३७२० इतकी विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. तसेच सर्व प्रवेश एकाच वेबसाईटवर करण्यात येत आहेत. सदर प्रवेश प्रक्रियेदरम्यान वेबसाईटवर उद्भवलेल्या तांत्रिक अडचणींमुळे व न्यायालयीन प्रकरणांमुळे प्रवेश प्रक्रिया उशीराने झालेली आहे.

परंतु विद्यार्थी व पालकांना आलेल्या समस्यांचे संचलनालय स्तरावरून वेळोवेळी निराकरण करण्यात आलेले आहे. व या प्रवेश प्रक्रियेतून एकही विद्यार्थी वंचित राहू नये यासाठी विद्यार्थी नोंदणीचा कालावधी वाढवून देण्यात आला होता.सद्य:स्थितीत पहिल्या फ़ेरीतील CAP आणि गुणवत्ता यादी दिनांक २८/०६/२०२५ रोजी जाहीर करण्यात आली असून दिनांक ३०/०६/२०२५ ते दिनांक ७/०७/२०२५ पर्यंत इयत्ता ११ वी चा प्रवेश महाविद्यालयात निश्चित करण्याकरीता विद्यार्थ्यांना कालावधी देण्यात आला आहे. सद्य:स्थितीत प्रवेश प्रक्रिया सुरळीत सुरु आहे.

तसेच विद्यार्थ्यांकरीता मार्गदर्शन केंद्र, कॉल सेंटर उभारण्यात आले आहेत. विभागीय स्तरावर तांत्रिक सहायक, ई-मेल, ऑनलाईन माहिती पुस्तिका, करीअर पाथ, प्रवेश प्रक्रिया संदर्भात मार्गदर्शन करीता जिल्हा

व विभागस्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांचे संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

वेबसाईटवरील तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी कंपनीस वारंवार निर्देश देण्यात आले आहेत व बैठकांचे आयोजन करून तात्काळ कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ८,००० गावांमध्ये प्राथमिक शाळा नसल्याबाबत

**(२३) * ३७५६ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सुनिल शिंदे, श्री.संजय खोडके, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संदीप जोशी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कमी पटसंख्येमुळे शाळांचे समायोजन सुरू असतानाच ८,२१३ गावांत अद्यापही प्राथमिक शिक्षण देणारी एकही शाळा अस्तित्वात नसल्याचे व सन २०२५-२६ या आगामी शैक्षणिक सत्रातील समग्र शिक्षण अभियानाचा अर्थसंकल्प ठरविण्यासाठी राज्य आणि केंद्रातील शिक्षण विभागाच्या संयुक्त बैठकीत "यूडायस", च्या आकडेवारीनुसार राज्यातील ८,००० गांवे अद्यापही शाळेविना वंचित असून शासकीय व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांची पट संख्या १२ लाख ३२ हजार ९३८ एवढी घटली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५ हजार ४६६ शाळांमध्ये प्रत्येकी ३० पेक्षा कमी विद्यार्थी असून किती गावांमध्ये प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत जिल्हास्तरांवर प्रस्तावांची संख्या किती आहे, तसेच केंद्रीय शिक्षण सचिवांनी या गंभीर शैक्षणिक दूरवस्थेवर लक्ष वेधत परिस्थितीत सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढविणेबाबत व ज्या ८,००० गावांत शाळा नाही त्याठिकाणी दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शाळा सुरु करण्याबाबत तसेच ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'गांव तिथे शाळा' अभियान राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) समग्र शिक्षा वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०२५-२६ मंजूर करतेवेळी केंद्र शासनाने राज्यामध्ये १६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा तसेच, ६५६३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा नसल्याचे निरीक्षण नोंदविले आहे. तथापि, ८,२१३ गावांत अद्यापही प्राथमिक शिक्षण देणारी एकही शाळा नाही, अशी वस्तुस्थिती नाही. तसेच, सन २०२४-२५ या वर्षात सन २०२३-२४ या वर्षाच्या तुलनेत यु-डायस माहितीनुसार शासकीय व अनुदानित शाळांमधील विद्यार्थी संख्येत ४,०९,३५८ इतकी घट झाली आहे.

(२) व (३) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतूदींनुसार अशा वस्त्या जिथे शाळा प्राथमिक स्तर १ कि.मी., उच्च प्राथमिक स्तर ३ कि.मी. व माध्यमिक स्तर ५ कि.मी. परिसरात उपलब्ध नाही, अश्या वस्त्यांमधील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी वाहतूक सुविधा,

निवासी सुविधा व अन्य सुविधा देण्यात येतील, अशी तरतूद आहे. त्यानुसार, समग्र शिक्षा व पीएमश्री योजनेमधून वाहतूक सुविधा प्रतिमहा रुपये ६००/- प्रमाणे १० महिन्याकरीता एकूण रुपये ६०००/- इतका वाहतूक भत्ता दिला जातो. तसेच, केंद्र शासनाने पीएम-जनमन अंतर्गत २५ व धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान या योजनेंतर्गत २२ अशा एकूण ४७ वसतिगृहांना मंजूरी दिलेली असून याद्वारे ४,७०० विद्यार्थ्यांना वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. राज्य शासनामार्फत सर्व शाळांचे जीआयएस मॅपिंग करण्यात येत आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यांनतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खडकपूर्णा प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक तीन मधील निकृष्ट कालव्यामुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२४)** * **४१०४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) येथील खडक पूर्ण प्रकल्पाचा टप्पा क्रमांक तीन वरील कालव्याच्या निकृष्ट दर्जामुळे कालव्याचे पाणी पाझरून वसंत नगर आणि भरोसा शिवारातील ३१५ एकरवरील पिकांचे नुकसान झाले मात्र या नुकसानाचे मूल्यांकन करताना शेतकऱ्यांना प्रत्यक्षात झालेल्या नुकसानीपेक्षा कमी भरपाई दिली जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या पाटाखालील वहीवाटीच्या जमिनींना कोरडवाहू क्षेत्रापेक्षाही कमी उंबरठा उत्पादन दर्शवण्यात आले तसेच शंभर टक्के नुकसान झालेले शेतकऱ्यांना प्रत्यक्षात झालेल्या नुकसानीपेक्षा कमी भरपाई दर्शविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाच्या नियमांनुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी तसेच निकृष्ट दर्जाच्या कालव्याची दुरुस्ती करणेबाबत अशा विविध मागण्यांचे निवेदन खडकपूर्णा कालवे विभागीय अभियंता यांचेकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी खडकपूर्णा कालवे विभागीय अभियंता यांचेकडे दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली तसेच खडकपूर्णा कालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

खडकपूर्णा प्रकल्प उसियों टप्पा क्र. ३ च्या जोड कालव्याची एकूण लांबी ५७०० मी. असून सदर जोड कालव्यावरुन टप्पा ३ व ४ वरील एकूण १२६७४ हे. सिंचन क्षेत्र आहे. खडकपुर्णा प्रकल्पा अंतर्गत टप्पा क्रमांक ०३ च्या कालव्या वरील रब्बी हंगाम सन २०२४-२५ चे आवर्तन १ व २ दरम्यान पाणी पाझरून बाधित झालेल्या क्षेत्राचे कृषी व महसूल विभागासोबत केलेल्या पंचनाम्यानुसार वसंतनगर व भरोसा शिवारातील एकूण ३४.२५ हे. क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झालेले आहे. बाधित पिकांच्या नुकसानीची

टक्केवारी व नुकसान भरपाईच्या मोबदल्याची रक्कम कृषी विभागाकडून शासनाच्या नियमानुसार परिगणीत करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.

महसूल व कृषी विभाग़ाकडुन केलेल्या पंचनाम्यानुसार कृषी विभागाकडून मोबदल्याची रक्कम शासनाच्या नियमानुसार परिगणीत करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे आहे.

खडकपुर्णा प्रकल्पाच्या कालव्याची दुरुस्ती करणे व इतर मागण्यांचे निवेदन माहे एप्रिल, २०२५ मध्ये क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त आहे.
(४) निवेदनाच्या अनुषंगाने कालवा दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना हमीभाव देण्याबाबत

**(२५) * ४१६९ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध बाजारांत सन २०२५-२६ या वर्षासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेल्या १३ खरीप शेतीपिकांच्या उत्पादीत मालाला किमान आधारभूत किंमती (एमएसपी) हमीभावापेक्षा कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असल्याने शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्याचे प्रमाण वाढत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजारात शेती उत्पादनाला मागणी, पुरवठ्याचे गणित, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील चढ-उतार, मध्यस्थांचा सुळसुळाट तसेच शासनाच्या खरेदी प्रक्रियेतील त्रुटी यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नसल्याने आणि काही प्रसंगी शेतकऱ्यांना घोषित हमीभावापेक्षा कमी दरानेच शेतमाल विकावा लागत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जाहीर केलेला हमीभाव आणि बाजारात प्रत्यक्षात मिळणारा दर यात मोठा फरक असल्याने शेतकरी तोटयात आहे, कागदपत्रातील त्रुटी, पोटखाते, तुकडेबंदी या सारख्या अडचणीमुळे शेतकऱ्यांना शासनाने सुरु केलेल्या केंद्रावर शेतमाल विक्री करणे व्यावहारिकदृष्टया शक्य नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने १३ खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीचा (एमएसपी) फायदा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मिळण्यासाठी शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य हमीभाव देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१), (२) व (३) नाही.
(४) किमान आधारभूत योजनेंतर्गत केंद्र शासनाने ऑक्टोबर, २०२४ मध्ये निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात हमीभाव खरेदी प्रक्रीया राबविण्यात आली आहे.

किमान आधारभूत योजनेंतर्गत राज्यशासनामार्फत हंगाम २०२४-२५ मधील हमीभाव खरेदी प्रक्रीया राबविण्यात आली आहे. हमीभाव खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| पीक | हमीभाव | खरेदी केंद्र | लाभार्थी शेतकरी | खरेदी (क्विंटल) |
|---|---|---|---|---|
| सोयाबीन | ४८९२/- | ५६२ | ५,११,६५७ | १,१२,१३,८४९ |
| मूग | ८६८२/- | ५६२ | ५२३ | ५८६६ |
| उडिद | ७४००/- | ५६२ | २४५ | २५२३ |
| तूर | ७५५०/- | ७६५ | ८५,७७७ | १३,३३,१२८.९ |
| हरभरा | ५६५०/- | ७५७ | २६७० | ५३,६७१ |

खरीप हंगाम सुरू झाल्यानंतर केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दराने कृषी विभागाच्या प्रथम पूर्व प्राथमिक अंदाजानुसार राज्यात केंद्रीय नोडल एजन्सी नाफेड व एनसीसीएफ यांच्या वतीने राज्यस्तरीय नोडल संस्थांमार्फत खरीप पिकांची केंद्रशासनाने जाहीर केलल्या निकषांनुसार (एफ.ए.क्यु) खरेदी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (मार्टी) अंमलबजावणीत दिरंगाई होत असल्याबाबत

**(२६) * ४३६९ श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (मार्टी) दिनांक २२ ऑगस्ट, २०२४ रोजी स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून या संस्थेसाठी शासनाने ११ पदे मंजूर केली असून ६.२५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करुनही अद्याप कार्यालय सुरु झाले नसल्याने अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती झाली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्याक संशोधन प्रशिक्षण संस्था (मार्टी) च्या अंमलबजावणीत होत असलेल्या दिरंगाईमुळे अल्पसंख्याक समाजाचे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सशक्तीकरण प्रभावित होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्पसंख्याक संशोधन प्रशिक्षण संस्था निधी व पदे मंजूर करुनही अद्यापही अल्पसंख्याक संस्था सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

"अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)" या संस्थेसाठी मंजूर पदांना उच्चस्तरीय समितीची मान्यता घेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून संस्थेसाठी लेखाशिर्षास मान्यता घेण्यात येत आहे.

अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासाकरीता विविध योजनांची अंमलबजावणी शासनस्तरावरुन करण्यात येत आहे.

(३) अल्पसंख्याक विभागाच्या अधिपत्याखालील "अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)" या संस्थेच्या मंजूर ११ पदांना उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु असून संस्थेसाठी मंजूर निधी आवश्यक बाबींवर खर्च करण्यासाठी नवीन लेखाशीर्ष घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच संस्था जलद कार्यान्वित व्हावी याकरीता सल्लागार (Advisor) पदाची नियुक्ती देखील करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत शेतकऱ्यांना कर्जमाफीचा परतावा मिळण्याबाबत

**(२७) * ३२१७ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १८०७८ ला दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज कालमर्यादेच्या आत परत केल्यानंतर त्याला ०% दराने कर्ज देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत पीक कर्जाची वेळेत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज परतावा दिला जात असून सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षातील २ लाख ३३ हजार २९७ शेतकऱ्यांचे ४६ कोटी २४ लाख रुपये अद्याप मिळाले नसल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यामध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालमर्यादेत कर्ज परतफेड करुनही शेतकऱ्यांना ०% दराने कर्ज देण्याबाबतचा लाभ दिला जात नसून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व्याज परतावा योजनेची रक्कम मिळाली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज कालमर्यादेच्या आत परत केल्यानंतर त्यांना ०% दराने कर्ज देण्याबाबतची व्याज सवलत देण्याबाबत तसेच सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षातील २ लाख ३३ हजार २९७ शेतकऱ्यांचे थकीत असलेले ४६ कोटी २४ लाख रुपये मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठीचे एकूण ५७.३८ लाख लाभार्थ्यांचे रुपये ४४९.०४ कोटी रक्कमेचे प्रस्ताव अदा करणे बाकी आहे.

(२) व (३) राज्य शासनाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये दिनांक ३० जून पूर्वी पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या कर्जदारांची केवळ मुद्दल रक्कम वसूल करुन त्यावरील व्याज सवलतीच्या रक्कमेच्या भरपाईची

मागणी शासनाकडे करण्याचे निर्देश दिनांक १८/०६/२००७ रोजी दिले आहेत. त्यानुसार सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या वर्षातील व्याज सवलत मागणीच्या प्रस्तावांसाठी सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये अनुक्रमे रुपये ३६८ कोटी व रुपये ३०० कोटीची अर्थसंकल्पिय तरतूद खर्च करण्यात आली आहे. तसेच सदर योजनेसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रुपये १०० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून सहकार आयुक्त कार्यालयाकडून याबाबतचा निधी प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यात कापड उद्योग उभारणी करणेबाबत

**(२८) * २५३६ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात उच्च प्रतीच्या कापसाचे उत्पादन चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यात घेतले जात असून चंद्रपूर जिल्ह्यातून ८ लाख ५० हजार तर यवतमाळ जिल्ह्यातून १० लाखांपेक्षाही अधिक याप्रमाणे विदर्भातून ६० लाखांपेक्षाही अधिक गठाणी (कापसाच्या एकत्र बांधलेल्या गाठी) दक्षिण भारतात कापडाची निर्मिती करण्यासाठी पाठविल्या जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात मोठ्या प्रमाणात उच्च प्रतीच्या कापसाचे उत्पादन होऊनही चंद्रपुर येथे टेक्स्टाइल इंडस्ट्रीज सुरु न होण्याची कारणे काय आहेत तसेच कापसाला योग्य भाव व बेरोजगारांना काम मिळण्यासाठी चंद्रपुरात टेक्सटाइल इंडस्ट्रीज सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय सावकारे :** (१) कृषी विभागाच्या https://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध माहिती नुसार, चंद्रपूर जिल्ह्यात ५१९७०० मेट्रिक टन गाठी आणि यवतमाळ जिल्ह्यात १२४४१०० मेट्रिक टन कापूस गाठींचे उत्पादन होत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात दरवर्षी अंदाजे १०० लाख कापूस गाठींचे उत्पादन होत असून, त्यापैकी साधारणतः ३० टक्के कापसावर राज्यात प्रक्रिया केली जाते आणि उर्वरित कापूस गाठीची इतरत्र विक्री केली जाते.

(२) राज्यातील वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी शासनाने वस्त्रोद्योग धोरण, २०११-१७ व वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ जाहीर करण्यात आले होते. तसेच आता शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२३ अन्वये, शासनाने राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणामध्ये ५ वर्षात २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणुक व ५ लाख रोजगार निर्मीतीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत राज्यातील वस्त्रोद्योगांना वीजदर सवलत, भांडवली अनुदान, सौर ऊर्जा अनुदान अशा विविध सवलतीचा लाभ राज्यातील वस्त्रोद्योग घटकांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या धोरणांतर्गत राज्यातील वस्त्रोद्योग एकूण ४ झोनमध्ये विभागण्यात आले आहे. झोन १ मध्ये नागपूर व अमरावती विभागाचा समावेश असून, या झोन १ मध्ये स्थापित वस्त्रोद्योग घटकांना सर्वाधिक अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सहसचिव पदाची नियमबाह्य पदभरती केल्याबाबत

**(२९) * ३३०३ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सहसचिव पदाची नियमबाह्य पध्दतीने पदभरती करण्यात आली असून दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ च्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, वर्धा यांचे पत्रात सहसचिव पदभरती मंजुरीच्या नमूद अटी व शर्तीचे पालन न करता नियमबाह्य नियुक्ती आदेश देण्यात आल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहसचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, आर्वी हे पद एकाकी असल्याने त्याची भरती पदोन्नतीने होणे अपेक्षित असताना, तसे न करता सरळसेवा भरती करण्यात आली आहे. तसेच बिंदुनामावलीस मंजूरी घेतली नसल्याचे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ च्या पत्रात नमूद केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सहसचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, आर्वी या एकाकी पदाची नियमबाह्य पदभरती करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) व (२) होय हे खरे आहे.

आर्वी कृषी उत्पन्न बाजार समिती, जि.वर्धा येथील सहसचिव पदावरील पदभरतीस जिल्हा उपनिबधंक, सहकारी संस्था, वर्धा यांनी दिनांक २१/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजुरी दिली आहे. तथापि, सदर अटी व शर्तीचे पालन न झाल्यामुळे दिनांक २५/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सहसचिव पदावर देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांनी बाजार समितीला निर्देश दिले आहेत.

(३) या प्रकरणात विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर येथे कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील नियम १०४ अन्वये सहसचिव पदावरील नियुक्त कर्मचाऱ्याने कृषी उत्पन्न बाजार समिती, आर्वी व इतर यांच्याविरुध्द अपिल अर्ज दाखल केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेनटाकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) प्रकल्पातील मुख्य कालव्याची दुरुस्ती करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३०) * २८२९ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेनटाकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) या प्रकल्पातील मुख्य कालव्याची दुरुस्ती करून लाभधारक शेतकऱ्यांना शेतीच्या सिंचनासाठी तात्काळ पाण्याची व्यवस्था करून शेतीची झालेली नुकसान भरपाई देणेबाबत रयत क्रांती संघटनेसह इतर संघटनांनी जलसमाधी आंदोलन केले असून पोलीसांनी तात्काळ आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतल्याचे माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२०-२०२१ ला पेनटाकळी, दुधा, ब्रह्मपुरी, रायपूर, पाचलासह काही गावातील लाभधारक शेतकऱ्यांच्या शेताचे नुकसान झाल्यामुळे त्यांनी नुकसान भरपाईसाठी तक्रारी दाखल केल्या असूनही या प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या गळतीची तात्काळ दुरुस्ती करुन नवीन कालवा RCC ट्रफसह कालवा करावा, अशी मागणी केल्यानंतरदेखील यासंदर्भात कुठलीही भूमिका प्रशासनाकडून घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोन वर्षांपासून प्रकल्प १००% क्षमतेने भरलेला असूनदेखील या मुख्य व शाखा कालव्यातून रायपुर, सावत्र, सोनारगव्हाण, मोसेंबेवाडी, मिस्किनवाडी, मारोतीपेठ, जानेफळ, निम्बा, लोणी, काळे, गोमेधर, उटी, घाटनांद्रा, वरवंड, बोथा, बार्डा येथील लाभधारक शेतकऱ्यांना पाणी सोडणे बंद असल्याने शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुख्य कालव्याच्या गळतीची दुरुस्ती करुन नविन कालवा RCC ट्रफसह कालवा तयार करुन शेतकऱ्यांना सिंचन होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच लाभधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) खरे नाही.

मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात व त्या सुमारास रयत क्रांती संघटनेचे व इतर कोणत्याही संघटनांचे निवेदन महामंडळास तसेच शासनास प्राप्त झाले नाही.
(२) नाही,

पेनटाकळी प्रकल्पाच्या मुख्य कालव्याची गळतीची दुरुस्ती करण्यासाठी मुख्य कालवा कि.मी. ० ते ११ मध्ये RCC Trough चे काम प्रकल्पाच्या पंचम सुप्रमा मध्ये अंतर्भुत करुन त्यास मंजूरी घेण्यात आली असून तद्नंतर सदर कामाची निविदा मागविण्यात आली होती. सद्य:स्थितीत पेनटाकळी प्रकल्पांतर्गत मुख्य कालवा कि.मी. ० ते ११ मध्ये RCC Trough चे काम प्रगतीपथावर आहे.
(३) अंशत: खरे आहे.

पेनटाकळी मोठा प्रकल्प सन २०२३-२४ मध्ये ५२ टक्के व सन २०२४-२५ मध्ये पूर्ण क्षमतेने (१००%) भरला होता.मुख्य उघड्या कालव्याचे RCC TROUGH चे काम पूर्ण झाल्यानंतर कालव्याद्वारे सिंचनाचे पाणी सोडणे नियोजित आहे.
(४) पेनटाकळी प्रकल्पाच्या मुख्य उघड्या कालव्याच्या गळतीच्या दुरुस्तीसाठी कायमस्वरुपी उपाय योजना म्हणून मुख्य कालवा कि.मी. ० ते ११ मध्ये RCC Trough चे काम प्रकल्पाच्या पंचम सुप्रमा मध्ये अंतर्भुत करुन त्यास मंजुरी घेण्यात आली असून सद्य:स्थितीत हे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर कालव्याद्वारे सिंचनाचे पाणी सोडणे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील शाळांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३१) * ३५९१ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील तसेच ग्रामीण भागातील मोडकळीस आलेल्या तसेच छत गळणाऱ्या शाळांच्या दुरुस्तीसाठी शालेय शिक्षण विभागाने शाळांकडून प्रस्ताव मागविण्यात आल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२४ च्या शैक्षणिक वर्षात सुमारे ४५५ शाळांच्या दुरुस्तीसाठी रुपये २० कोटी रकमेची आवश्यकता असताना शासनाकडून ९ कोटी रुपये इतकाच निधी प्राप्त झाल्यामुळे अनेक शाळांची अद्यापही दुरवस्था झाली असून या शाळांची स्थिती पावसाळ्यामध्ये मुलांसाठी धोकादायक झाली असल्याने सदर शाळांची पाहणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शाळांच्या देखभाल दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करून शिक्षण विभागाने सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) रायगड जिल्ह्यातील ४५५ शाळागृह दूरूस्ती कामाकरीता रक्कम रुपये २०.८२ कोटी निधी मागणी प्रस्ताव प्राप्त झाले होते. सन २०२४-२५ वर्षाकरीता जिल्हा वार्षिक योजनेत ३९२ शाळांसाठी रुपये १७.४१ कोटी व जि.प.सेस अंतर्गत २४ शाळांसाठी रुपये ८०.०० लक्ष शाळागृह दुरूस्ती करीता निधी उपलब्ध करण्यात आला. तसेच १२ शाळांच्या वर्गखोली बांधकामाकरीता रुपये ८० लक्ष व जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्ह्यातील २९ शाळांना नवीन वर्गखोली बांधकामाकरीता रुपये २.९५ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानूसार शाळांची कामे प्रगतीपथावर व पूर्ण झालेली आहेत.

(३) शासन व जिल्हा परिषदांकडून सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, वित्त आयोग, आमदार- खासदार निधी, सी.एस.आर फंड, समग्र शिक्षा अभियान व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान, शाळा दत्तक योजना या माध्यमांतून इमारतींचे बांधकाम, पायाभुत सुविधा व देखभाल दूरूस्ती केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका हद्दीतील पाटबंधारे विभागाच्या जागेवरील अतिक्रमणाबाबत

**(३२) * २७०८ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीत पुणे सोलापूर रोडवर अण्णासाहेब मगर भाजी मार्केटच्या पाठीमागे असलेल्या बेला विस्टा हाऊसिंग सोसायटीच्या सभासदांनी शेजारील पाटबंधारे विभागाच्या मोकळया जागेत अतिक्रमण करून झोपड्या उभारलेल्या असून, सदर अतिक्रमण काढून घ्यावे असा अर्ज माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सदर सोसायटीचे सभासदांनी माहे एप्रिल, २०१८, माहे जुलै, २०१९, माहे जून, २०२२ असे एकूण ३ वेळेला पत्राद्वारे निवेदन केले आहे. तसेच, हडपसर विधानसभा मतदारसंघांमधून जाणाऱ्या कॅनॉलच्या कडेला अधिकाऱ्यांच्या संगनमताने सर्वच ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पाटबंधारे विभागाच्या मोकळया जागेत तसेच कॅनालच्या कडेला असलेल्या अतिक्रमित झोपड्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

बेला विस्टा सोसायटीच्या पाठीमागे पाटबंधारे खात्याच्या कॅनॉल लगतच्या मोकळया जागेवर अतिक्रमण केले असून त्याठिकाणी अनाधिकृतपणे कायम स्वरुपी बांधकाम केले जात असल्याबाबत दिनांक ११/०३/२०२५ रोजी बेला विस्टा सोसायटीने कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग यांना अर्ज केलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

बेला विस्टा सोसायटीने दिनांक ११/०४/२०१८, दिनांक २८/०४/२०२२ व दिनांक १३/१२/२०२२ अन्वये भविष्यात सदर जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता असल्याबाबतचे अर्ज जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयास दिले आहेत.

(३) अतिक्रमणे निष्कासित करण्याकरीता जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत पुणे महानगरपालिका, महसूल विभाग तसेच गृह विभागाच्या समन्वयाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराच्या अनुदानात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३)** * **२६८२ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील ३२९ शाळांमध्ये रविवारी शाळेला सुट्टी असतानाही शालेय पोषण आहाराचे वाटप केले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सुट्टीच्या दिवशीही आहार वाटप दाखवून अधिकचे अनुदान मिळवून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना लाभ दिल्याबाबतची दैनंदिन नोंद एम.डी.एम पोर्टलवर करणे आवश्यक आहे. प्रस्तुत लाभार्थी नोंदीनुसार देयके अदा केली जातात.

सदर योजनेंतर्गत यवतमाळ जिल्ह्यामधील २७५२ पात्र शाळांपैकी १५१ शाळांनी सुट्टीच्या दिवशी पोषण आहाराचा लाभ दिल्याची नोंद एम.डी.एम पोर्टलवर करण्यात आली होती. सदर शाळांना कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या आहेत. शाळांचे खुलासे प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी सुट्टीच्या दिवशी लाभ दिल्याची नोंद केलेल्या शाळांची देयके सादर करताना सुट्टीच्या कालावधीची देयके वजा करुन उर्वरित देयके सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत ज्या शाळांनी सुट्टीच्या दिवशी लाभ दिल्याची नोंद एम.डी.एम पोर्टलवर केली आहे अशा शाळांमधील संबंधितांवर नियमानुसार उचित कारवाई करण्याचे निर्देश सर्व जिल्ह्यांना देण्यात आले आहेत. तसेच, एम.डी.एम. पोर्टलमध्ये सुट्टीच्या दिवशी माहिती भरता येणार नाही, असा बदल करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत एन. आय. सी., पुणे यांना देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या एलएलबीच्या विद्यार्थ्यांना चुकीची प्रश्नपत्रिका दिल्याबाबत

**(३४) * ३७७८ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने एलएलबी अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना चुकीची प्रश्नपत्रिका दिली व त्यानंतर तासाभरात प्रश्नपत्रिका बदलून दिल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर अधिक वेळ थांबावे लागले असल्याचे दिनांक ७ मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकीची प्रश्नपत्रिका मिळाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी बराच पेपर सोडविला होता.त्यानंतर नवीन प्रश्नपत्रिका मिळाल्यावर त्यांना पुन्हा नव्याने पेपर सोडवावा लागला असून त्याकरीता विद्यापीठाने विद्यार्थ्यांना एक तास वाढवून दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीतून काय निष्पन्न झाले आहे चौकशीच्या अनुषंगाने एलएलबी अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना चुकीची प्रश्नपत्रिका देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

विद्यापीठातर्फे प्रथम सत्र (उन्हाळी) २०२५ मध्ये विधी अभ्यासक्रमाची परीक्षा दिनांक ०७ मे, २०२५ रोजी सकाळच्या सत्रात i) Law of Crimes (७५:२५ पॅटर्न First LL.B (३ Years)(Choice Based)(R-२०२२-२३)(Sem II)) ii) Law of Crimes (६०:४० पॅटर्न) आणि iii) Bharatiya Nyay Sanhita २०२३ (७५:२५ पॅटर्न Sem-II व Sem-VI) या विषयांची परीक्षा सर्व महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रावर आयोजित केली होती.

तीनही विषयांच्या वेगवेगळया प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्राना पाठविण्यात आल्या होत्या. Law of Crimes (७५:२५ पॅटर्न) या प्रश्नपत्रिकेत Bharatiya Nyay Sanhita २०२३ या अभ्यासक्रमामधील प्रश्न समाविष्ट करण्यात आले आहेत असे निदर्शनास आल्याने विद्यापीठाकडून लगेचच Law of Crimes (७५:२५ पॅटर्न) ची प्रश्नपत्रिका DEPDS प्रणालीमार्फत सर्व महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्राना पाठवण्यात आली. विद्यापीठाने या अभ्यासक्रमाच्या परिक्षार्थींना परीक्षेसाठी वेळ वाढवून देऊन परिक्षार्थींचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली आहे.

(३) Bharatiya Naya Sanhita २०२३ (७५:२५ पॅटर्न) हा विषय विद्यापीठातील विधी अभ्यासक्रमात प्रथमच समाविष्ट करण्यात आला आहे. या विषयाच्या आणि Law of Crimes (७५:२५ पॅटर्न) या विषयाच्या अभ्यासक्रमातील ९०% प्रश्न सारख्याच पध्द्तीचे आहेत. असे संबंधित विषयाच्या अध्यक्षांनी आपल्या अहवालात नमुद केले आहे. तरी, सदर प्रकरणाची विद्यापीठाकडून चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृष्णानगर जिहे-कठापूर (जि.सातारा) येथील कार्यकारी अभियंता यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(३५) * ३५३७ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिहे-कठापूर (जि.सातारा) येथील कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत उपसा सिंचन, कृष्णानगरच्या कार्यकारी अभियंता यांनी वेगवेगळया ठेकेदारांना ७६३ कोटी ७७ लाख ६७ हजार ३८९ रकमेची निविदा देऊन विविध कंपन्यांच्या नावावर कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता यांनी आपल्या पत्नीला भागीदार करुन कृष्णा खोरेची निविदा देऊन ठेकेदारांकडून शासकीय निधीचा अपहार केल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता यांनी आपल्या पत्नीला भागीदार करुन कृष्णा खोरेची निविदा देऊन ठेकेदारांकडून कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) सदर विषयाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) व (३) सविस्तर चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सात्री (ता.अमळनेर, जि.जळगाव) हे गाव निम्न तापी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात असल्याने पर्यायी रस्ता तयार करण्याबाबत

**(३६) * ३९७१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सात्री (ता.अमळनेर, जि.जळगाव) हे गाव निम्न तापी प्रकल्पात १०० टक्के बुडीत क्षेत्रात असल्यामुळे पावसाळयात पाण्यामुळे गावाचा संपर्क तुटत असून पर्यायी रस्ता बांधकाम होत नसल्याने दिनांक ५ मे, २०२५ रोजी निम्न तापी प्रकल्पाच्या बॅक वॉटरमध्ये जल समाधी घेत असलेबाबतचे निवेदन ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी व कार्यकारी संचालक, अधीक्षक अभियंता पाटबंधारे विभाग, यांना दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, चौकशीच्या अनुषंगाने सात्री ता.अमळनेर येथे पर्यायी रस्ता बांधकाम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.
(२) निम्न तापी प्रकल्प, पाडळसे या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सात्री गाव पूर्णत: बाधित होणार आहे. या गावाच्या पुनर्वसन सुविधांचे काम प्रगतीत असून सदर पुनर्वसित गावठाणासाठी स्वतंत्र रस्ता तयार करण्यात आलेला आहे, मात्र ग्रामस्थ अद्याप स्थलांतरीत झाले नाहीत. मूळ सात्री गावासाठी तालूक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी असलेला मार्ग पावसाळयामध्ये वहिवाटीसाठी बंद होतो व इतरत्र कोणताही मार्ग उपलब्ध राहत नाही. या अडचणीच्या अनुषंगाने पर्यायी रस्ता तयार करण्यासाठी निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांना कांदा अनुदान मिळण्याबाबत

**(३७)** * **२९२२ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२३ मध्ये भाव कमी झाल्याने शासनाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान जाहीर केले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येवला (जिल्हा नाशिक) येथील १७ हजार ७३२ कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे अनुदानासाठी बाजार समितीने शासनाकडे प्रस्ताव पाठविले होते, यापैकी १४ हजार ९०० पात्र लाभार्थी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ११ लाख ९८ हजार २३ क्विंटल कांद्याचे ४१ कोटी ९३ लाख ८ हजार ३२६ रुपये अनुदान बाजार समितीला प्राप्त झाल्यानंतर लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यांवर वर्ग करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सातबारा उताऱ्यावर कांदा पीक पेऱ्याची नोंद नसलेले व उशिरा तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्या सहीने पंचनामा व अहवाल सादर करण्यात आलेल्या येवला तालुक्यातील १६९८ लाभार्थी शेतकऱ्यांचे सुमारे ३ कोटी ६२ लाख रुपये अनुदान शासनाकडून अद्यापही प्राप्त झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, येवला तालुक्यातील १६९८ लाभार्थी शेतकऱ्यांचे सुमारे ३ कोटी ६२ लाख रुपये थकीत अनुदान वितरीत करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय.

दिनांक २७/०३/२०२३ च्या शासन निर्णयान्वये सन २०२२-२३ या वर्षात राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना रुपये ३५० प्रति क्विंटल अनुदान जाहीर करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) सन २०२२-२३ मधील कांदा अनुदान योजनेंतर्गत राज्यात फेरछाननी अंती पात्र लाभार्थ्यांना अनुदान देण्याकरीता पुरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीत वाहनतळ व्यवस्था करण्याबाबत

**(३८) * ३८७३ श्री.संजय केणेकर, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) ही आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ असून येथे दररोज महाराष्ट्राच्या विविध भागांतून तसेच परराज्यातून हजारो वाहने शेतमाल घेऊन येतात, या बाजारपेठेत येणाऱ्या वाहनांसाठी पुरेशा आणि योग्य वाहनतळाची (parking) व्यवस्था नसल्यामुळे वाहनधारकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील एपीएमसी बाजार समितीमध्ये एकूण पाच बाजारपेठा कार्यरत असून यामध्ये भाजीपाला, फळे, कांदा-बटाटा, धान्य व किराणा तसेच मसाला बाजारमध्ये दिवसाला कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असून पूर्वी काही ठराविक पिकांचे उत्पादन होत असे, पण आता फळे, भाजीपाला, कडधान्ये अशा अनेक प्रकारच्या पिकांचे उत्पादन वाढले आहे. या प्रत्येक प्रकारच्या मालासाठी वेगळया प्रकारच्या वाहतुकीची आणि हाताळणीची गरज असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्राहकांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आणि वेळेत माल पोहोचविण्यासाठी अधिक वाहने वापरली जातात. ई-कॉमर्स आणि थेट ग्राहक वितरण प्रणालीमुळेही त्याचप्रमाणे विशिष्ट हंगामात (उदा. आंबे, द्राक्षे, कांदे, टोमॅटो) किंवा सणासुदीच्या काळात बाजार समितीत येणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड वाढते. हजारो वाहने एकाच वेळी बाजार समितीच्या आवारात प्रवेश करण्याचा किंवा बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते. यामुळे मालाच्या वाहतुकीला विलंब होतो आणि शेतकरी व व्यापाऱ्यांचे नुकसान होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बाजार समितीत येणाऱ्या वाहनांच्या संख्येतील प्रचंड वाढ यामुळे APMC च्या अस्तित्वातील पायाभूत सुविधा (विशेषतः रस्ते आणि पार्किंग व्यवस्था) पूर्णपणे अपुऱ्या पडत आहेत, यामुळे बाजारपेठेतील व्यवहार सुलभपणे पार पडण्यात अडथळे निर्माण होत असून, वाहतूक कोंडी, गैरसोय आणि आर्थिक नुकसान यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमाल घेऊन येणाऱ्या वाहनांना व वाहन चालकांची गैरसोय होऊ नये याकरीता योग्य वाहनतळाची (parking) व्यवस्था उपलब्ध करुन देण्याबाबत

शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) बाजार समितीमधील वाहतूक सुरळीत करण्यासाठी बाजार समितीचा सुरक्षा विभाग व एपीएमसी तुर्भे वाहतूक विभागाचे पोलीस प्रशासन हे समन्वयाने वाहतूक कोंडी सुरळीत करण्यात येते. बाजार समितीत येणाऱ्या वाहनांसाठी ट्रक टर्मिनलची निर्मिती केलेली असल्यामुळे सदरची सुविधा कायम रहावी यासाठी सदर ट्रक टर्मिनलचा भुखंड सिडको लि. ने बाजार समितीस हस्तांतरीत करण्यासाठी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि.सी.बी.डी. बेलापूर नवी मुंबई यांना विनंती केलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरळी कांचन (जि.पुणे) येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या जमीन विक्रीबाबत

**(३९) * ४१०६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरळी कांचन (जि.पुणे) येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या जमीन विक्रीस कारखाना बचाव कृती समितीने तीव्र विरोध केला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे नेमके किती कर्ज आहे याची माहिती कारखाना सभासद आणि कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली नाही, तसेच कारखान्याच्या संचालक मंडळाकडून कारखान्याची जमीन तोट्यात विक्री करण्यात येत असल्याने कर्मचाऱ्यांनी व सभासदांनी या जमीन विक्रीबाबत नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कारखान्याची जमीन तोट्यात विक्री करण्याऱ्या संबंधित संचालक मंडळातील दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर जमीन योग्य त्या किंमतीला विक्री करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

विकास सदाशिव लवांडे व इतर ३ यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्र. ५२७०/२०२५ मधील नमूद मागण्यांपैकी, यशवंत सहकारी साखर कारखाना लि. थेऊर, ता.हवेली, जि.पुणे या कारखान्याच्या प्रस्तावीत जमीन विक्री व्यवहारास स्थगिती मिळावी ही एक मागणी आहे. मा.उच्च न्यायालय यांचेसमोर दाखल याचिकेची पुढील सुनावणी दिनांक १५/०७/२०२५ रोजी ठेवण्यात आली आहे.
(२) यशवंत सहकारी साखर कारखाना लि. थेऊर, ता.हवेली, जि.पुणे या कारखान्याचे दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंत लेखापरीक्षण पूर्ण झाले आहे. लेखापरीक्षीत ताळेबंद व लेखापरीक्षण अहवालातील नमूद तपशीलानुसार साखर कारखान्याकडे दिनांक ३१/०३/२०२४ रोजी एकूण रुपये ३४.६४ कोटी कर्ज रक्कम व रुपये २१.४७ कोटी कर्जावरील देणे व्याज असे एकूण ५६.११ कोटी देणे बाकी दिसते.

कारखान्याने दिनांक ३०/०६/२०२५ रोजीच्या पत्रा सोबत सादर केलेल्या तपशीलामध्ये रुपये १४८.३० कोटी कर्ज रक्कम आणि त्याची ओटीएस रक्कम रुपये ३६.६० कोटी व कर्जावरील व्याज देणे रुपये २१.१२ कोटी असे एकूण रुपये ५७.७२ कोटी दर्शविले आहे.

कर्जासंदर्भातील टिप्पणी परिपत्रक छपाई करुन वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांना देण्यात आले आहे.

कारखान्याच्या संचालक मंडळाकडून कारखान्याची जमीन तोट्यात विक्री करण्यात येत असल्याने कर्मचाऱ्यांनी व सभासदांनी या जमीन विक्रीबाबत नाराजी व्यक्त केली असून, प्रादेशिक सहसंचालक, पुणे कार्यालयात त्याबाबत सभासदांनी तक्रार अर्ज सादर केलेला असून सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०/०७/२०२५ रोजी प्रादेशिक सहसंचालक, पुणे कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी (ता.कारंजा, जि.वर्धा) येथील कारनदी प्रकल्पावरून सेलगाव लवणे उपसासिंचन योजना सुरू करणेबाबत

**(४०) * ४०२७ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (ता.कारंजा, जि.वर्धा) येथील कारनदी प्रकल्पावरून सेलगाव लवणे उपसा सिंचन योजना सुरू करणे व प्रकल्पाचे रुंदीकरण करून उपसा सिंचन योजना आदिवासी शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्यान्वित करण्याबाबतचे निवेदन मा.जलसंपदा मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी शेतकऱ्यांचे जीवनामध्ये परिवर्तन होण्याचे दृष्टीने उक्त निवेदनानुसार उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय,

(२) सेलगाव लवणे उपसा सिंचन योजना शासन निर्धारित मापदंडात बसत नाही तसेच कार नदी प्रकल्पातील संपूर्ण पाणीसाठ्याचे नियोजन झालेले आहे. प्रकल्पामध्ये पाणी उपलब्ध नसल्यामुळे सेलगाव लवणे उपसा सिंचन योजना हाती घेणे शक्य होणार नाही.

कार नदी प्रकल्प उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात आहे. या पाणलोट क्षेत्रात अतिरिक्त पाणी उपलब्ध नसल्याने या प्रकल्पाच्या साठवण क्षमतेत वाढ करता येत नाही, त्यामुळे सांडव्याची उंची वाढविणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वारणानगर शाखेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४१) * ३८९४ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वारणानगर शाखेमध्ये बँकेतील कर्मचाऱ्यांनी संगनमताने बँकेतील पे स्लीपवर व धनादेशावर खोट्या सह्या करून व खातेदारांच्या नावे बनावट खाते उघडून ३ कोटी २१ लाख ९१ हजार ६१९ रुपयांचा अपहार केला असून सदर बँकेतील लिपिक व इतर यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून बँकेचा शाखाधिकारी मात्र अद्याप फरार असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा घटना अनेक ठिकाणी होत आहेत या अनुषंगाने सहकार विभागाने सर्वसामान्य जनतेचे हित जपण्यासाठी अशा सहकारी बँकेवर अंकुश ठेवण्याच्या उद्देशाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली तसेच कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील कर्मचारी व शाखाधिकारी यांनी संगनमताने ३ कोटी २१ लाख ९१ हजार ६१९ रुपयांचा केलेल्या गैरव्यवहाराबाबत संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय.
(२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे वैधानिक लेखापरीक्षण दरवर्षी करण्यात येते. त्याचप्रमाणे नाबार्डकडूनही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची वार्षिक तपासणी करण्यात येते. सदर लेखापरीक्षण/तपासणी मध्ये सहकारी बँकांमध्ये अपहार/गैरव्यहार झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अपहार/गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याच्या व अपहारीत रक्कम वसुलीसाठी लवाद दाखल करण्याच्या सूचना नाबार्ड मार्फत सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना देण्यात आल्या आहेत.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वारणानगर शाखेमध्ये झालेल्या अपहारास जबाबदार असणाऱ्या श्री.तानाजी ईश्वरा पोवार, श्री.शिवाजी शहाजी पाटील-कॅशिअर, श्रीमती मिनाश्री भगवान कांबळे-कॅशियर, श्री.शरिफ मुन्ताज मुल्ला- कॅशियर व श्री.मुकेश विलास पाटील-लिपिक यांचे विरुध्द कोडोली, ता.पन्हाळा येथील पोलीस ठाण्यामध्ये दिनांक २९/०४/२०२५ रोजी फौजदारी गुन्हा क्र.०११९ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील सर्व आरोपींना अटक करण्यात आले असून सद्य:स्थितीत सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

बँकेने दिनांक २९/०४/२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री.शरिफ मुन्ताज मुल्ला यांना बँकेच्या सेवेतून बडतर्फ केले आहे व उर्वरित कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांकडून शालेय वस्तू ठराविक विक्रेत्यांकडून खरेदी करण्याची सक्ती होत असल्याबाबत

**(४२) * ३६५९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शाळांकडून विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पुस्तके इत्यादी शालेय वस्तू ठराविक विक्रेत्यांकडून खरेदी करण्याची सक्ती होत असून यासंदर्भात जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १६ जून,२०२३ रोजी वा त्यासुमारास कारवाईचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचधर्तीवर राज्यातही विद्यार्थ्यांना युनिफॉर्म, वह्या, पुस्तके इत्यादी शालेय वस्तू ठराविक विक्रेत्यांकडून खरेदी करण्यास सक्ती करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत सुराज्य अभियानाच्या वतीने दिनांक १७ मार्च,२०२५ रोजी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदन प्राप्त झाल्यानंतर मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासंदर्भात प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना निर्देश दिले आहेत, हे ही खरे अाहे काय,

(४) असल्यास, शालेय शिक्षण विभागामार्फत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने कोणते परिपत्रक, आदेश किंवा मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत वा करण्यात येणार आहेत, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शिक्षण विभागाने कोणत्या प्रकारची खबरदारी घेतली आहे,

(५) असल्यास, या संदर्भात शैक्षणिक संस्थांकडून पालकांवर विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पुस्तके इत्यादी शालेय वस्तू ठराविक विक्रेत्यांकडून खरेदी करण्यास सक्ती करण्यात येऊ नये व पालकांना आपल्या सोयीनुसार आणि आर्थिक क्षमतेनुसार वस्तू खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४), (५) व (६) सदर निवेदनाच्या अनुषंगाने तसेच शासन निर्णय दिनांक ११ जून, २००४ मधील तरतूदींचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील रिक्त पदांमुळे परिक्षेच्या व्यवस्थापनात अडचणी येत असल्याबाबत

**(४३) * २७०३ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यासाठी १३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची जबाबदारी सांभाळणाऱ्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाची (सीईटी सेल) अवस्था अत्यंत दयनीय असून संपूर्ण यंत्रणा केवळ १३ कर्मचाऱ्यांवर सुरू असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कक्षास मंजूर असलेल्या ३० पदांपैकी तब्बल १७ पदे दहा वर्षांपासून रिक्त असून सीईटी कक्षातील १३ पदांपैकी सनदी अधिकाऱ्यांची दोन पदे शासनाने थेट भरलेली आहेत तर महत्वाची परीक्षा समन्वयक ही चार पदे प्रतिनियुक्तीने भरली असून उर्वरित सात पदे कंत्राटी पध्द्तीने भरली आहेत, तसेच परीक्षा समन्वयक ही प्रमुख भूमिका बजावणारी १२ पदे मंजूर असतानाही त्यापैकी केवळ चार पदे भरलेली आहेत, सीईटी कक्षातील रिक्त पदामुळे याचा विपरीत परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कारकीर्दीवर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकरीता (सीईटी सेल) मंजूर असलेल्या ३० पदांपैकी रिक्त असलेली १७ पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक ०४/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षात एकूण ३० पदे निर्माण केली आहेत. तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामध्ये अन्य विभागांतील अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात आल्या आहेत त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | कार्यरत अधिकारी/ कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| १ | शासन नियुक्त | ०२ |
| २ | प्रतिनियुक्तीने/सेवा वर्ग व उनसवारी तत्वावर कार्यरत अधिकारी | ०८ |
| ३ | प्रतिनियुक्तीने (फक्त सीईटी व कॅप पुरते) | ०३ |
| ४ | कंत्राटी तत्वावर | २७ |
| एकूण | | ४० |

(२) नाही.

सद्य:स्थिती राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षात ०८ परीक्षा समन्वयक व ०३ सहायक परीक्षा समन्वयक असे एकूण ११ अधिकारी कार्यरत आहे.
(३) व (४) सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक २०/०६/२०२५ व दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये सहायक परीक्षा समन्वयक, प्रशासकीय अधिकारी व प्रबंधक हे रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात आली आहे.

----------------

## सातारा येथील जानाई-मळाई शिक्षण संस्थेच्या शाळांनी बोगस विद्यार्थी दाखवून मान्यता घेतल्याबाबत

**(४४) * ३६०१ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिखली (पो. ठोसेघर ता.सातारा) येथील जानाई-मळाई शिक्षण संस्थेच्या शाळांमध्ये बोगस विद्यार्थी दाखवून मान्यता घेण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थेच्या या शाळेतील विद्यार्थी पटसंख्या व संभाजीनगर (ता.सातारा) या शाळेची पटसंख्या बोगस असून शिक्षकांची भरतीही चुकीच्या पध्दतीने करण्यात आल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले असून सदर संस्थेने खोटी व बनावट कागदपत्रे सादर करून शाळेला मान्यता घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त संस्थेच्या शाळांची बनावट कागदपत्रे तयार करुन शाळेची मान्यता घेणाऱ्या संबंधित दोषी संस्था चालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

नेहरू युवा मंडळ, गारवाडी, ता.खटाव, जि.सातारा या संस्थेस श्रीराम माध्यमिक विद्यालय, मारवाडी, ता.खटाव, जि.सातारा ही शाळा शैक्षणिक वर्ष सन २०००-०१ पासून विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती.

तदनंतर सदर शाळेचे शासन निर्णय दिनांक २३/०८/२०२१ अन्वये चिखली, ता.जि.सातारा येथे स्थलांतर करण्यास तसेच शासन निर्णय दिनांक २४/०३/२०२३ अन्वये सदर शाळा श्री जानाई मळाई शिक्षण संस्था, सातारा या संस्थेस हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच स्टूडंट पोर्टल वरील सन २०२४-२५ मधील विद्यार्थी आधार पडताळणी अहवालानुसार सदर शाळेतील एकूण ७० विद्यार्थ्यांपैकी ६८ विद्यार्थांची आधार पडताळणी झालेली दिसून येते.

(२) हे खरे नाही.

सदर संस्था संचलित, लोकमान्य हायस्कूल, माने कॉलनी, देगाव रोड, एमआयडीसी (संभाजीनगर), ता.जि.सातारा या शाळेस शैक्षणिक वर्ष सन २००५-०६ पासून विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली असून सदर शाळेच्या नावात श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज राजेभोसले हायस्कूल असा बदल करण्यात आला आहे.

स्टूडंट पोर्टल वरील सन २०२४-२५ मधील विद्यार्थांच्या आधार पडताळणी अहवालनुसार सदर शाळेतील एकूण १३३ विद्यार्थ्यांपैकी १३० विद्यार्थांची आधार पडताळणी झालेली दिसून येते.

तसेच संस्थेने विहित मार्गाचा अवलंब करून शाळेतील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असल्याचे दिसून येते. तसेच शासन निर्णय दिनांक १५/११/२०११ मधील तरतुदीनुसार सन २०१३-१४ मध्ये सदर शाळेचे मूल्यांकन समितीने मूल्यांकन केले असून सदर शाळा पात्र ठरविली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पहुर (ता.जामनेर, जि.जळगाव) येथील संस्थेने बनावट संच मान्यतेनुसार शिक्षकांची पदे वाढवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(४५) * ३९७७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पहुर (ता.जामनेर, जि.जळगाव) येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय या संस्थेने बनावट संच मान्यतेनुसार ०७ शिक्षक व ०१ शिपाई यांचे सुमारे ४५ लाखांची वेतन देयके काढून शासनाची फसवणूक केली असल्याचे तसेच पाचोरा तालुक्यातील काही संस्थांनी बनावट संच मान्यतेनुसार शिक्षकांची पदे वाढवून कोट्यवधी रुपयांची वेतनदेयके काढून शासनाची फसवणूक केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, चौकशीच्या अनुषंगाने बनावट संच मान्यतेनुसार शिक्षकांची पदे दाखवून कोटयवधी रुपयांची देयके काढून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) सावित्रीबाई फ़ुले माध्यमिक विद्यालय, पहूर ता.जामनेर, जि.जळगाव या शाळेच्या संच मान्यतेमध्ये १० शिक्षक व १ कनिष्ठ लिपिक ही पदे मान्य आहेत. सदर शाळा ही अंशत: अनुदानित तत्वावर आहे. परंतु सदर शाळेतील संचमान्यतेमध्ये मंजूर पदांपेक्षा अधिकचे ०७ शिक्षक व ०१ शिपाई यांचे अतिरिक्त ४४,०८,३३२ रूपयांचे वेतन देयक अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी (माध्यमिक), जळगांव या कार्यालयाने माहे फेब्रुवारी, २०२५ च्या देयकामध्ये काढण्यात आलेले आहे. तद्नंतर सदर कर्मचाऱ्यांचे पुढील देयके स्थगित करण्यात आलेली आहे. तसेच, बनावट संचमान्यतेच्या आधारे जास्तीचे शिक्षकाची नियुक्ती करून शासनास नुकसान करीत असलेबाबत पाचोरा तालुक्यातील अन्य ५ शाळा चौकशीअंती आढळल्या असून मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल याचिकेतील आदेशानुसार संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन सुरु आहे.

(२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. जळगाव यांच्या आदेशानुसार अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी कार्यालय, जळगांव यांनी सावित्रीबाई फ़ुले माध्यमिक विद्यालयाला संच मान्यतेत मंजूर पदांपेक्षा जास्त पदांचे वेतन कोणत्या आधारे वेतन देयकात समाविष्ट करण्यात आल्याबाबत खुलासा सादर करण्याबाबत कळविले. याबाबत संबंधित शाळेने सादर केलेला खुलासा हा समाधानकारक नसल्याने जास्तीचे अदा करण्यात आलेले वेतन हे मुख्याध्यापक यांनी चलनाद्वारे वसुल करून शासन खाती भरणा करणेबाबत आदेशित करण्यात आले होते. तथापि, सदर कार्यवाहीस मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल याचिकेतील आदेशानुसार सद्य:स्थितीत स्थगिती देण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.